# संकेतस्थळावर प्रसिध्दी दयावयाचा मसुदा

कोल्हापूर जिल्हा परिषद/पंचायत समिती क्षेत्रातील सर्व लोकांना या जाहीर प्रसिध्दीव्दारे कळविण्यात येते की, जिल्हा परिषद/पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीकरिता राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२९/का.७,दि.२२ नोव्हेंबर २०१६ अन्वये मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे.राज्य निवडणूक आयोग यांचा आदेश क्रमांक:- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२/का-५ दिनांक १० जानेवारी २०१७ अन्वये कोल्हापूर जिल्हा परिषद/ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता मतदार यादी तयार करण्यासाठी दिनांक ५ जानेवारी २०१७ या दिवशी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी ग्राहय धरणेत येईल असे अधिसूचित करणेत आले असून त्यानुसार जि.प. व पं.स. सार्वत्रिक निवडणूका २०१७ करीता तयार करणेत आलेली प्रारुप मतदार यादी दिनांक १२ जानेवारी २०१७ रोजी प्रसिध्द केली जाणार आहे.या प्रारुप मतदार यादीची प्रत तहसिलदार यांच्या कार्यालयामध्ये पाहणीसाठी व निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. या यादीसंदर्भात नागरिकांच्या काही हरकती किंवा सूचना असल्यास त्या दिनांक १७ जानेवारी २०१७ पर्यंत तालुक्याचे सबंधित तहसिलदार यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी सादर कराव्यात.या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.

(डॉ.अमित सैनी)
जिल्हाधिकारी कोल्हापूर